वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक–अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार–मंगळवार दि.९ डिसेंबर २०२५ पाने ४

## स्व.संतोष देशमुख प्रकरणातील आरोपी सुटतेल त्याच दिवशी

# बीड जिल्हा बंद, राज्यात एकही चाक फिरणार नाही–मनोज जरांगे

Email:- dailydivyawarta@Gmail.com

Email:-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता

### वाल्मिक अण्णांचा बेल होणार!

## देशमुख साहेबांच्या रडारवर, परळी पोलिस देशमुखांची तक्रार घेईना!



बीडच्या परळी नगरपालिका निवडणूक मतदानानंतर देखील गाजत आहे. परळीच्या मैदानात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्ष आणि अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात सामना रंगला आहे.मतदानानंतर स्ट्राँग रूममधील 'ईव्हीएम' सुरक्षेवरून शरद पवार यांच्या राष्ट्रवादीच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार संध्या देशमुख यांचे पती दीपक देशमुख आक्रमक झाले असतानाच, आता अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे आमदार धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय माजी नगराध्यक्षपद बाजीराव धर्माधिकारी यांचा कॉल रेकॉर्डिंग व्हायरल झाल्याने राजकीय खळबळ उडाली आहे.

बाजीराव धर्माधिकारी यांचा

▶▶ पान २ वर







बीड ,(दिव्य न्युज):- मस्साजोगचे सरपंच दिवंगत संतोष देशमुख हत्या प्रकरणाला आज एक वर्ष पूर्ण झाले. त्या पार्श्वभूमीवर मनोज जरांगे पाटील यांनी मस्साजोगमध्ये जाऊन पीडित देशमुख कुटुंबीयांची भेट घेतली. या प्रकरणात निकाल येण्यासाठी वर्ष उजडणार नाही असं वाटलं होतं, त्याच्या वल्गना मुख्यमंत्र्यांकडून झाल्या होत्या. एक वर्षाच्या आत या प्रकरणातील आरोपींना फासावर लटकू असा शब्द दिला होता. मात्र, या प्रकरणात दिरंगाई होत आहे. सरकार पक्षात अजितदादांचा एक आमदार आहे, त्यांनी एक टायर पंक्चर केलेलं आहे, तोच या प्रकरणात यंत्रणा चालवत आहे, असे म्हणत मनोज जरांगे पाटीलयांनी नाव न घेता पुन्हा एकदा आमदार धनंजय मुंडे यांना लक्ष्य केलं. हे प्रकरण भिजत गोंधळ ठेवायचं आहे का अशी शंका येत असल्याचंही त्यांनी म्हटलं.

संतोष देशमुख यांच्या प्रकरणात आम्ही एक आहोत, एका लेकीला आणि एका लेकाला आपला बाप दिसत नाही. आरोपी तातडीने फासावर गेल्याशिवाय आमचं समाधान नाही. परळीवाल्यांनी काही माणसं

▶▶ पान २ वर

### सात आमदार असतानाही होता विरोधी पक्ष नेता

## आता दोन्ही सभागृहांना विरोधी पक्ष नेताच नसणं किती घातक?



मुंबई ,(दिव्य न्युज):- विधिमंडळाने १९३७ पासून ते २०२४ पर्यंत विरोधी पक्ष नेत्यांच्या नावांची यादी दिली आहे. पण या यादीत २०२५ मध्ये म्हणजेच २०२४ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुका झाल्यानंतर कुणाचे नाव येईल किंवा येणारच नाही यावरून सध्या राजकारण पेटलंय.याचं कारण म्हणजे यावेळी महाराष्ट्राच्या निवडणुकीत भाजप – १३२, शिवसेना – ५७ (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी – ४१ ( अजित पवार ) एकूण २३० असे सत्ताधाऱ्यांकडे बहुमत आहे. शिवसेना नेते भास्कर जाधव जसं म्हणतात तसं म्हणायचं ठरवलं तर सत्ताधाऱ्यांकडे 'पाशवी बहुमत' आहे.

दुसऱ्या बाजूला शिवसेना – २० ( ठाकरे गट ) काँग्रेस ( १६ ) आणि राष्ट्रवादी काँग्रेस – १० (शरदचंद्र पवार ) – एकूण ४६ इतकं मत विरोधकांकडे विधानसभेत आहे.विरोधी पक्षाचा नेता होण्यासाठी त्या पक्षाचे सभागृहाच्या एकूण संख्येच्या १० टक्के आमदार असणे आवश्यक असल्याचं सत्ताधाऱ्यांचे म्हणणे आहे. 'त्यांच्याकडे पुरेसे संख्याबळच नाहीये, तर विरोधी पक्ष नेता कसं बनवणार?' असं वक्तव्य एकनाथ शिंदेंनी केलं आहे.राज्यघटनेत आणि विधिमंडळाच्या नियमांमध्ये याबाबत काय सांगितले आहे. याआधी इतिहासात असं कधी घडलं आहे का, की विरोधी पक्षाकडे कमी संख्याबळ आहे, पण तरीदेखील विधानसभेत विरोधी पक्ष नेता आहे.विरोधी पक्ष नेत्याला कोणते विशेषाधिकार आहेत आणि विरोधी पक्ष नेता सभागृहात नसणे हे लोकशाहीसाठी घातक ठरू शकते का? या प्रश्नांचा वेध आपण या लेखातून घेणार आहोत.घटनातज्ज्ञ प्रा. उल्हास बापट यांनी बीबीसी मराठीला सांगितले, विरोधी पक्ष नेता हा संसदीय लोकशाहीसाठी आवश्यक असतो. आपण इंग्लंडमधील संसदेचं वेस्टमिन्स्टर मॉडल स्वीकारलेलं आहे. त्या ठिकाणी दोन पक्ष

▶▶ पान २ वर

## मस्केंना लागला होता पैसे खाण्याचा चष्का

### लाचलुचपत विभागाने दाखविला जोरदार हिसका



बीड, (दिव्य न्युज):- नगर पालिका निवडणुकीच्या धामधुमीतच बीड नगर पालिका पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. मागील महिन्यातच अविनाश धांडे नामक कर्मचाऱ्याने वरिष्ठ आणि सहकारी कर्मचाऱ्यांची नावे लिहून पालिकेच्या छतावर आत्महत्या केली होती. या घटनेची चौकशी सुरू असतानाच, आता मंगळवारी पालिकेतील एका सफाई कामगाराला एक हजार रुपयांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले आहे.तक्रारदार यांनी एका महिन्यापूर्वी प्लॉट विक्रीसाठी अर्ज केला होता. त्यांना त्यांच्या

▶▶ पान २ वर

## छेड काढणाऱ्या शिपायाला महिलांनी दिला चोप

### टेम्पोत टाकून नेले पोलीस ठाण्यात

गेवराई ,(दिव्य न्युज):- तुमच्या शेतात सोलर मिळणार असून त्यासाठी शेतातील फोटो काढायचा, असा बहाणा करून ग्रामपंचायतच्या शिपायाने शेतात गेलेल्या महिलेचा हात धरून छेडछाड करून विनयभंग केला. त्यानंतर तो शिपाई गावात आल्यानंतर महिलांनी त्याला मारहाण करून टेम्पोत टाकून तलवाडा पोलिस ठाण्यात नेत गुन्हा दाखल केला. विशेष म्हणजे, यापूर्वी सुद्धा त्याच्यावर महिलांची छेड काढल्या प्रकरणी गुन्हा दाखल आहे.

जालिंदर सुरवसे (रा नांदलगाव) असे महिलांनी मारहाण केलेल्या ग्रामपंचायत शिपायाचे नाव आहे. शुक्रवार रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास गावातील एका महिलेला जालिंदर म्हणाला की, तुमच्या शेतात सोलर मिळणार आहे. त्यासाठी शेताचा व सोलर जिथे

▶▶ पान २ वर

## काँग्रेसच्या नेत्याला विरोधीपक्ष नेतेपद!

### भाजपच्या खेळीने मविआत फूट?

मुंबई ,(दिव्य न्युज):- विधीमंडळाचे नागपूर अधिवेशनाला सुरुवात झाली आहे. विधान परिषद आणि विधानसभेतील विरोधी पक्षनेते रिक्त आहे. विधीमंडळाच्या इतिहासात पहिल्यांदाच दोन्ही सभागृहाची विरोधी पक्षनेतेपदा रिक्त राहण्याची ही पहिलीच वेळ आहे.

दरम्यान, भास्कर जाधव यांचा विधानसभा आणि सतेज पाटील यांचा विधान परिषदेच्या विरोधी पक्षनेतेपदासाठी आग्रह महाविकास आघाडीकडून धरण्यात आला आहे. त्यासाठी पत्र देखील देण्यात आले आहे. मात्र, या दोघांच्या नावाला भाजपने विरोध केला आहे.भाजपने विधानसभेत भास्कर जाधव यांच्या ऐवजी काँग्रेसचे विधीमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांना विरोधी पक्षनेतेपद देण्याची तयारी दाखवली आहे. तर, विधान परिषदेमध्ये सतेज पाटील यांच्या ऐवजी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते अनिल परब यांना विरोधीपक्ष नेतेपद देण्याची तयारी दाखवली आहे.

एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेचा भास्कर जाधव यांच्या नावाला तीव्र विरोध आहे. जाधव हे आक्रमक नेते आहेत. त्यांची नियुक्ती झाली तर ते त्यांच्या निशाण्यावर एकनाथ शिंदे हे असतील याची भीती शिवसेनेच्या नेत्यांना आहे. त्यामुळे भाजपकडे



शिवसेनेकडून भास्कर जाधव यांच्य नावाला तीव्र विरोध करण्यात येत आहे.विधासभा

▶▶ पान २ वर

# आमदाराकडून बाबरी मशिदीची पायाभरणी

### डोक्यावर विटा, हजारोंची गर्दी;भाजपशी काय कनेक्शन?

कोलकाता,(दिव्य न्युज):- काँग्रेसमधून निलंबित झालेल्या आमदार हुमायू कबीर यांनी गेल्या शनिवारी स्वत:ची ताकद दाखवली. बाबरी मशीद पुन्हा उभारण्याची घोषणा करत त्यांनी लोकांना यासाठी पुढे येण्याचं आवाहन केलं. त्यानंतर त्यांचे समर्थक विटा घेऊन मुर्शिदाबादच्या बेलडांगा परिसरात पोहोचले. जवळपास अडीच ते तीन लाखांची गर्दी उसळली. बाबरी मशीद पाडल्याच्या घटनेला ३३ वर्ष पूर्ण होत असताना हुमायू यांनी बाबरी पुन्हा उभारण्याची घोषणा केली.

मुर्शिदाबादच्या बेलडांगा परिसरात बाबरी मशिदीची उभारणी करण्याची घोषणा आमदार हुमायू कबीर यांनी केलेली आहे. मी सरकारकडून एक रुपया घेणार नाही. यासाठी ८० कोटी रुपये जमवले जातील, असं कबीर यांनी उपस्थितांना संबोधित करताना म्हटलं. सरकारी निधी घेतला तर मशिदीच्या पवित्रेवर त्याचा परिणाम होईल, असं कबीर म्हणाले. मुर्शिदाबादमध्ये ६६ टक्के मुस्लिम लोकसंख्या असल्यानं कबीर यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमाला मोठा प्रतिसाद मिळाला.मशीद उभारण्याची घोषणा करणाऱ्या हुमायू कबीर यांच्यापासून तृणमूल

▶▶ पान २ वर



# रॉकेट तंत्रज्ञान, बिनव्याजी बँका, साखर कारखाने ते आरमाराचा निर्माता-टिपू सुलतान

लंडनच्या लिडनहाल स्ट्रीटवर ईस्ट इंडिया कंपनीचे मुख्यालय होते. टिपू जोपर्यंत हयात होता, तोपर्यंत लिडनहाल स्ट्रीटसाठी म्हैसूर हे धडकी भरवणारे आणि कंपनीच्या अस्तित्त्वाला हादरे देणारे भारतातील महत्वाचे केंद्र होते, असे मत प्रसिद्ध इतिहासकार बी. शेख अली यांनी मांडले आहे.टिपू सुलतानने आपल्या राजकीय धोरणात सामान्य माणासाला सामावून घेण्याचे धोरण आखले होते. त्याने व्यापाराच्या माध्यमातून सामान्य रयतेच्या प्रगतीची योजना आखली होती. भारतातील उत्पादनावर आणि जगभरातील बाजारपेठेवर त्याची नजर होती.

स्वदेशी वस्तूंच्या वापरासंदर्भात आणि परदेशी व्यापाऱ्यांवरील बहिष्कारासंदर्भात कालिकतच्या फौजदाराला त्याने आदेश दिले होते. त्या आदेशात तो म्हणतो, 'तेथील जनतेला आणि व्यापाऱ्यांना तू सांगितले पाहिजेस, इंग्रज व्यापाऱ्यांना कोणतेही माल विकू नये आणि त्यांच्याकडून कोणतेही माल खरेदी करु नये. त्यामुळे इंग्रज व्यापाऱ्यांचा इथे निभाव लागणार नाही.'

नुसत्या परदेशी वस्तूंच्या वापरांना आळा घालून टिपू थांबला नाही, तर त्याने सामान्य शेतकऱ्यांमध्ये जागतिक बाजारपेठेविषयी जागरुकता निर्माण केली.व्यापारी कंपनीची स्थापना करुन त्यात रयतेला सामावून घेण्यासाठी प्रयत्न केले. त्या कंपनीत लोकांनी गुंतवणूक करावी यासाठी आवाहन केले.कंपनीचा जो हुकुमनामा त्याने काढला होता. त्यात तो म्हणतो, सल्तनत-ए-खुदादादच्या रयतेला कोणत्याही धर्म आणि वर्णभेदाशिवाय व्यापारात सहभागी होऊन नफा मिळवण्याबाबत आदेश दिला जात आहे. रयतेतील जी व्यक्ती ५ ते ५०० इमामीपर्यंत रक्कम व्यापारात लावण्यासाठी जमा करेल, त्याला वर्षाच्या अखेरीस त्याच्या स्वतःच्या रकमेसह प्रत्येक इमामीच्या बदल्यात अर्धा इमामी म्हणजे मुळ गुंतवणुकीच्या शेकडा पन्नास टक्के नफा दिला जाईल. जी व्यक्ती ५०० ते ५,००० इमामी गुंतवेल, त्याला २५ टक्के, जी व्यक्ती ५,००० इमामीपेक्षा आधिक रक्कम जमा करेल, त्याला १२.५ टक्के नफा दिला जाईल.''म्हैसूरमध्ये आपल्या कंपनीच्या एजंटांद्वारे जे माल जमा केले जाई. त्यावर प्रक्रिया करून टिपू तो माल मोठमोठ्या जहाजांवर लादून जागतिक बाजारपेठेत नेऊन विकत असे. त्यातून कंपनी आणि म्हैसूरच्या शेतकऱ्यांना अधिकचा नफा मिळत असे.



टिपूने जागतिक बाजारपेठेची गरज ओळखून परदेशातील अनेक पिके भारतात आणण्याचा प्रयत्न केला. ही पिके म्हैसूरमध्ये उगवता, यावी यासाठी टिपूने संशोधन सुरु केले.लालबाग नावाची कृषी प्रयोगशाळा स्थापन केली. तेथे या पिकांचे पहिले उत्पादन घेतले जाई व त्यानंतर त्याची बिजे शेतकऱ्यांना वाटली जात होती.टिपू सुलतानने राज्यात शेतकऱ्यांच्या मालावर प्रक्रिया करणारे अनेक कारखाने सुरु केले होते. जगातल्या वेगवेगळ्या भागातून रेशीमकिडे आणून त्याचे संगोपन सुरु केले. त्यातूनच म्हैसूर सिल्कसिटी म्हणून जगात नावारुपाला आले.इतिहास संशोधक आणि प्रसिद्ध लेखक इरफान हबीब म्हणतात, 'टिपूच्या दुरदृष्टीचे एक उदाहरण म्हैसूरमध्ये रेशीम उत्पादनाची सुरुवात होती. जे पुढील काळात एक यशस्वी उद्योगाच्या रुपात विकसित झाले. तुतीची झाडे लावण्याची कामे निवडक शेतकऱ्यांना व तालुकेदारांना सोपवण्यात आली. रेशीमच्या किड्यांचे संगोपन व जतन करण्यासाठी राज्यात २१ केंद्रे स्थापन करण्यात आली होती.''श्रीरंगपट्टणमजवळ पालहल्ली आणि चिन्नपट्टणम या शहरांमध्ये दोन साखर कारखान्यांची निर्मिती केली होती. त्यातील एका साखर कारखान्याचे नाव 'श्री अष्टग्रामा शुगर मिल्स' असे होते. त्यातून उत्पादित साखर जागतिक बाजारपेठेत पोहोचवली जात असे.त्यात तो म्हणतो, काझीने आपल्या प्रदेशात जनगणना करुन पुरुष, स्त्री आणि लहान मुले यांची सर्व माहिती गोळा करावी. त्यांची उत्पन्नाची साधने कोणती आहेत ते देखील पहावे. कोणी बरोजगार असेल तर त्यांना सरकारकडून पन्नास ते शंभर रुपये मिळवून द्यावेत आणि कामावर लावावे. शेती करणाऱ्या व्यक्तींनी काही कारणाने शेती सोडली असेल, बेरोजगार झाले असतील तर प्रत्येकाला दोन नांगर आणि बैलांसोबत कृषी खर्चासाठी २० ते ३० रुपये द्यावेत.

याशिवाय टिपूने कावेरी नदीवर मही धरण बांधण्याची योजना आखली होती. 'या धरणाचे पाणी घेऊन जो शेतकरी शेती करेल त्याला कर माफ' करण्यात येईल अशीही घोषणा या धरणाच्या कोनशिलेत करण्यात आली होती.ही कोनशिला कृष्णराजसागर धरण बांधत असताना १९११ साली खोदकामात सापडली. या कोनशिलेवर १२ जून १७९८ ची तारीख नोंदवलेली आहे. ही कोनशिला कृष्णराजसागर धरणाच्या प्रवेशद्वारात लावण्यात आली आहे.टिपू सुलतानने राज्यात बिनव्याजी बँका स्थापन केल्या. त्या बँकाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्यात आले. त्याशिवाय या बँका शेतकऱ्यांना शेळ्या व अन्य गरजेच्या वस्तू देखील पुरवत असत.हैदर अली आणि टिपू सुलतान दोघांनीही म्हैसूरच्या सैन्याचे आधुनिकिकरण करण्याचा प्रयत्न केला. प्रसंगी फ्रेंचांची आणि इतर मित्रांची मदत घेऊन युरोपी शस्त्रांची म्हैसूरमध्ये निर्मिती करण्याची योजना आखली. त्यातून अनेक नव्या शस्त्रांचा शोध लावण्यातही टिपू सुलतानला यश आले होते.इरफान हबीब लिहितात, टिपूच्या कारागीरांकडून बनवलेल्या बंदुका पाहून १७८६ मध्ये पाँडेचरीच्या गव्हर्नर कोसिनीने या बंदुका युरोपीयन बंदुकापेक्षा चांगल्या दर्जाच्या असल्याचे म्हटले होते. १७८८ मध्ये १६ व्या लुईला जेव्हा या बंदुका भेट दिल्या त्यावेळी त्यानेही अशाच पद्धतीचे मत मांडले होते.टिपूने शस्त्रास्त्रनिर्मिती कारखान्यांची क्षमता वाढवण्यासाठी निरनिराळे प्रयोग करुन पाहिले. कर्नल कर्क पेट्रीक याने टिपू सुलतानचे पत्रे भाषांतरीत केली आहेत. त्यामध्ये अनेक वेगवेगळ्या प्रयोगांची माहिती त्याने दिली आहे.तो लिहितो, 'श्रीरंगपट्टणम येथील बंदुकीच्या कारखान्यातील कुल्ले पाण्याच्या दाबावर चालत होती. या कारखान्यात अशी एक मशीन होती, जी पुर्णतः जलसंचलित होती. या मशिनद्वारे बंदुक आणि तोफेच्या नळीला भोके पाडली जात होती. टिपूने अनेक यंत्र बनवले होते. त्यात घड्याळ, खेळणी वगैरेंचाही समावेश होतो. टिपूचे एक स्वयंचलित खेळणे आजही अभ्यासकांच्या आकर्षणाचा केंद्र आहे. त्या खेळण्याला चावी दिल्यानंतर त्यातील वाघाच्या तोंडून डरकाळ्या बाहेर निघतात. तर इंग्रज सैनिकाच्या तोंडून विव्हळण्याचा आवाज बाहेर पडतो.'भारतात तोफेचा वापर तुर्कांनी सुरु केला. तर अग्निबाणाचा वापर अकबराच्या काळात सुरु झाल्याचे मानले जाते. काहींनी अग्निबाणाच्या निर्मितीचा काळ आणखी मागे नेला आहे. पण टिपू सुलतानने निर्माण केलेल्या रॉकेटचे तंत्रज्ञान सर्वात आधुनीक होते.डॉ. शिव गजरानी यांनी टिपूच्या रॉकेट तंत्रज्ञानाची माहिती दिली आहे. ते लिहितात, टिपूने त्याच्या फतुहाते मुजाहीदीन या ग्रंथात रॉकेटविषयी लिखाण केले आहे. त्याच्याकडे २०० प्रशिक्षित सैनिकांची रॉकेट चालवणारी एक तुकडी होती. त्याला कुशून ब्रिगेड असे म्हणत. टिपूने बनवलेल्या रॉकेटची लांबी ११/२-३ डायमिटर इतकी होती. लोहनळीचा वापर करुन रॉकेटची निर्मिती करण्यात आली होती. १०० मीटरवर गेल्यानंतर या रॉकेटचा प्रचंड स्फोट होत असे. ६ फेब्रुवारी १७९२ साली कावेरीच्या दक्षिणेत इंग्रज फौजांवर या रॉकेटचा मारा करण्यात आला होता. म्हैसूर ताब्यात आल्यानंतर इंग्रजांना ६०० रॉकेट लाँचर, ७०० तयार रॉकेट, ९,००० रिकामे रॉकेट मिळाले होते.''याच रॉकेटचा वापर पुढे नेपोलियन विरोधातील युद्धात करण्यात आला. त्यामुळे नेपोलियनचा पराभव झाल्याचे मत इलियास नद्वी भटकली यांनी मांडले आहे.टिपू सुलतानने सैन्याची रचना जगात सर्वोत्तम पध्दतीने केली होती. त्याने लिहीलेल्या 'फतुहात ए मुजाहीदीन' या ग्रंथात याची सविस्तर माहिती मिळते.टिपूने सैनिकांच्या आणि आधिकाऱ्यांच्या शिक्षणाकडे लक्ष देऊन त्यांच्या पात्रतेनुसार त्यांना जबाबदारी दिली होती. अंतरराष्ट्रीय राजकारणात टिपूला सर्वाधिक रस होता. त्यामुळे जगभरातील भाषांचे शिक्षण काही सैनिकांना देण्यासोबतच अंतरराष्ट्रीय जलमार्गाचा वापर करण्यासाठी आधुनिक जहाजांची निर्मितीही त्याने केली होती.जमालाबाद, वाजीदाबाद आणि मजिदाबाद अशा तीन कचेऱ्यांमध्ये टिपूचे जहाज कार्यरत होते. जमालाबाद कचेरीत १२ आणि इतर दोन कचेऱ्यांमध्ये प्रत्येकी १४ जहाज होते.

इरफान हबीब लिहितात, प्रत्येक लष्करी जहाजावर ३४६ लोकांची नियुक्ती करण्यात आली होती. २० लष्करी जहाजांवर ६९२० लोक कार्यरत होते. या कर्मचाऱ्यांना पाच मुख्य श्रेण्यांमध्ये विभागण्यात आले होते. बंदूक चालवणारे, तोफची, मल्लाह, कारागीर शर्बशरान, नफकीरनवाज (नफकीर वाजवणारे), शहनाई नवाज (वाद्यवादक), युजदार (लेफ्टनंट), सरखेल (सेकंट लेफ्टनंट), जमादार (सर्जंट ) आणि शिपाई यांचा समावेश असायचा.

दैनिक दिव्य वार्ता अन्यायावर-प्रहार दृष्टांचा संहार विशेष

पान ४ वरून

## माजलगांवत रेशन

केल्या आहेत. स्थानिक प्रशासन धान्य वितरण विभाग याकड़े जाणीव पूर्वक दुर्लक्ष करत आहे. असल्याचा आरोप नगरीकांकडून होत आहे. सरकारी अधिकारियोंनी तातडीने रेशन दुकानाची तपासणी करून दोषींवर करवाई करावी, अशी मागणी केली जात आहे. सरकार कडून गरीबासाठी राबवलेल्या योजनाचा लाभ असा निकृष्ट माल देऊन दिला जात असेल तर त्याचा मूळ उद्देश्यच फोल ठरतो. गरीबाच्या आरोग्यशी असा खेळ करनांरयावर कठोर कारवाई झाली पाहिजे. अशी जनतेची ठाम मागणी आहे.

## 'ज्ञानराधा'च्या

मल्टीस्टेटमध्ये पैसे गुंतवलेल्या ठेवीदारांना मोठा दिलासा मिळाला असून, आता प्रत्यक्ष पैसे परतावा कधी सुरू होतो, याकडे लक्ष लागले आहे.

कुठल्मा मालमत्तांवर टाच ?

शासनाच्मा आदेशानुसार सुरेश कुटे, अर्चना कुटे आणि इतर आरोपींच्मा नावे असलेल्मा अनेक मालमत्ता जप्त करण्मात आल्मा आहेत. मामध्मे प्रामुख्माने विविध मालमत्तांचा समावेश आहे. त्मात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील गारखेडा परिसरातील मस्पेस ऑलम्पिमाफ इमारतीमधील कार्मालमे आणि फ्लॅट्स, गंगापूर तालुक्मातील सय्मदपूर मेथील जमिनी, तसेच बीडमधील कसबे, मांजरसुंबा, आणि बहीरवाडी मेथील शेकडो हेक्टर शेतजमिनी मांचा समावेश आहे. तसेच संस्थेची आमसीआमसीआम बँक आणि अहमदनगर जिल्हा बँकेतील खाती, तसेच रवींद्र तलबे, रघुनाथ खरसाडे, मशवंत कुलकर्णी आणि कैलास मोहिते मा व्मक्तींची मबँक ऑफ महाराष्ट्रफ्मधील वैमक्तिक खाती गोठवली आहेत.

ठेवीदारांचा पैसे मिळण्याचा मार्ग मोकळा

जप्त केलेल्मा मा सर्व मालमत्तेवर निमंत्रण ठेवण्मासाठी आणि पुढील कामदेशीर प्रक्रिमा पार पाडण्मासाठी बीडच्मा उपविभागीम अधिकाऱ्मांची मसक्षम प्राधिकारीफ म्हणून निमुक्ती करण्मात आली आहे. शासनाच्मा मा निर्णमामुळे सुरेश कुटे आणि त्मांच्मा सहकाऱ्मांना मोठा धक्का बसला असून, ठेवीदारांना त्मांचे कष्टाचे पैसे परत मिळण्माचा मार्ग मोकळा झाला आहे.

## शासकीय अध्यापक

पंकजाताई गोपीनाथरावजी मुंड साहेबा पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री महाराष्ट्र राज्य यांचे सांगण्यावरून चार४ प्राध्यापक श्री कैलास दातखिड साहेब विभागीय शिक्षण उपसंचालक छत्रपती संभाजी नगर यांनी नामदार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे साहेबा यांच्या सांगण्यावरून चार प्राध्यापक शिक्षण अधिकारी बीड यांना लेखी आदेश दिले नेकनूर करांच्या वतीने नामदार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे साहेबा यांचे खूप खूप अभिनंदन शोएब आमदार व त्यांचे सहकार्याने अभिनंदन करत आहे गेल्या कित्येक वर्षापासून शासकीय अध्यापक विद्यालय एक प्राध्यापिका होते तेही दोन महिन्यापासून जालना येथे पदोन्नतीवर गेल्यामुळे एक ही प्राध्यापक विद्यार्थी व विद्यार्थिनींना शिक्षण देण्यासाठी नव्हते बीड शिक्षणाधिकारी साहेबांना तात्काळ चार प्राध्यापकांचे समायोजन नियुक्त्या करण्याचे आदेश दिले व आमचे प्रयत्न करण्याचे यश आले भविष्यात मराठी माध्यम असो की उर्दू माध्यम असो कुठेही शिक्षक कमी असल्यास त्यासाठी आम्ही शिक्षक आणण्यासाठीप्रयत्न करणार असे सय्यद शोहिब आमदार भारतीय जनता पार्टी बीड जिल्हा अल्पसंख्यांक सरचिटणीस व समाजसेवक यांनी सांगितले व मला शेख राईस रेफ्रिजेशन प्रोप्रायटर, शेख रऊफ उद्योजक यांनी मला अमूल्य वेळ देऊन सहकार्य केले.

---

पान १ वरून

## देशमुख साहेबांच्या

व्हायरल झालेल्या कॉल रेकॉर्डिंगमध्ये वाल्मिक कराड याचा बेल होणार असून, नगरपालिका निवडणुकीत दीपक साहेबांच्या रडारवर आल्याचं म्हटलं आहे. त्यामुळे खळबळ उडाली आहे. व्हायरल झालेल्या कॉल रेकॉर्डिंगवर दीपक देशमुख यांनी प्रतिक्रिया देत, परळी पोलिसांकडे तक्रार दाखल केली आहे. परंतु पोलिसांकडे अर्ज जमा केला असून, त्यात जीविताला धोका असल्याचं म्हटलं आहे.

परळीतील माजी नगराध्यक्ष आणि माजी मंत्री धनंजय मुंडे यांचे निकटवर्ती बाजीराव धर्माधिकारी यांच्या व्हायरल कॉल रेकॉर्डिंगमध्ये वाल्मिक अण्णा सुटणार आहे. अण्णांची बेल होणार आहे. सगळं व्यवस्थित होणार आहे, असे म्हणत आता दीपक सोबत फिरू नका, तो साहेबांच्या रडारवर आहे. तुम्ही सगळं पाठीमागे पाहिलं आहे ना, काय झालं ते! असं म्हटलं आहे.व्हायरल झालेल्या या कॉल रेकॉर्डिंगमुळे परळीत खळबळ उडाली आहे. यावर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार संध्या देशमुख यांचे पती दीपक देशमुख यांनी प्रतिक्रिया दिली आहे. माझ्या एकट्याच्या जीविताला भिती नसून, यांचं न ऐकलेले माझ्यासोबत निवडणुकीला उभे राहिले आहेत, त्या सर्वांनाची भीती असल्याचा दावा केला आहे.

संबंधित कॉल रेकॉर्डिंग संदर्भात परळी पोलिस तक्रार घ्यायला तयार नाहीत. माझ्या जीविताला अशा लोकांपासून धोका आहे. हे जसं म्हणतील तसंच ऐकावं लागतं. हम करे सो कायदा आहे इथं. दीपक देशमुख धनंजय मुंडे यांच्या रडारवर आहे, असे संबंधित कॉल रेकॉर्डिंगमध्ये म्हटल्याचं स्पष्ट ऐकायला येत असल्याकडे दीपक देशमुख यांनी लक्ष वेधलं.वाल्मिक अण्णा जेलमधून बाहेर येणार आहे आणि सर्व काही साफ करणार आहे. मात्र कोणाला साफ करणार आहेत हेही सांगा, असा प्रश्न केला. मला या अगोदरही अशाच पद्धतीने धमक्या आल्या. पोलिसांना या कॉल रेकॉर्डिंग संदर्भात दोन वेळा तक्रार केली. पण घेतली नाही. आता पोलिसांकडे अर्ज जमा करून आलो आहे. त्यात जीविताला धोका असल्याचे आपण म्हटल्याचं दीपक देशमुख यांनी म्हटलं आहे.

## बीड जिल्हा बंद

पेरुन ठेवले आहेत, त्यांनी काही माणसाला सांगितलं आहे की, आपला एक माणूस सुटणार असं बोला. हे परळीतल्या लोकांकडून बोलून घेतलं जात आहे, असे मनोज जरांगे यांनी सांगितलं. तसेच, ज्या दिवशी या प्रकरणातील आरोपी सुटेल त्या दिवशी हा जिल्हा पूर्ण बंद ठेवायचा, त्यानंतर राज्य बंद ठेवण्यात येईल, असेही त्यांनी म्हटले. परळीवाला असं का घडवून आणतो हे सरकारने शोधलं पाहिजे, सरकार अडचणीत येण्याचे स्टेटमेंट तो का करतो हे बघितलं पाहिजे. मात्र, तू सुटणार नाही हे सत्य आहे, असा इशाराही जरांगे पाटील यांनी दिला आहे.

धन्यानीच हा सगळा प्रकार घडून आणला आहे, जोपर्यंत आरोपींना फाशी होत नाही, तोपर्यंत आम्ही कुणीही मागे हटणार नाहीत. ज्या दिवशी तो सुटेल त्या दिवशी राज्यात चाक देखील फिरणार नाही. आधी या प्रकरणाच्या तपासाचा वेग योग्य वाटत होता, कारण त्यावेळेस फडणवीस यांनी शब्द दिला होता. फडणवीस साहेबांच्या एका शब्दावर सगळे लोक शांत बसले होते. सरकार या प्रकरणात दबाव आणते काय बघितलं पाहिजे? क्रूर हत्या करणारे बाहेर फिरतात कृष्णा आंधळे कुठे आहे? असा सवालही जरांगे पाटील यांनी उपस्थित केला.

पोलीस महासंचालकांसोबत कशाची बैठक झाली?

क्रूर हत्या करणारे सापडत नाहीत, तुमच्यासाठी परळीवाला महत्त्वाचा आहे का? आंधळेने मारतानाचे व्हिडिओ कॉल केले आहेत, तो पकडला की या प्रकरणाचा मोठा उलगडा होईल. आज अधिवेशनात देशमुख प्रकरणाचा मुद्दा उचलला गेला आहे, इतकी क्रूर हत्या आहे. सरकारने हा विषय चार-पाच महिन्याच्या आत संपवावा. पुढे कुटुंबांनी हाक दिल्यास आम्ही कशाचा विचार करणार नाहीत. ओबीसीचे नेते कितीतरी आहेत त्यांना मोठे करा. अशा क्रूर लोकांना सांभाळत असाल तर आम्हाला अजित दादाचा राग येणार, तुम्ही चुकीच्या माणसाला जवळ करत आहात. काल तर तो त्यांना घेऊन गेला, अजित पवार आणि त्याची बैठक झाली. पोलीस महासंचालकाची बैठक झाली, पण विकासाच्या कामात पोलीस महासंचालकाचे काय काम? काहीतरी शिजत आहे, फडणवीस तुम्ही याच्यात सहभागी होऊ नका, असेही जरांगे पाटील यांनी म्हटले.

## आता दोन्ही

लोकशाहीला बळकटी मिळणारे वर्तन होण्याऐवजी कायद्यातील पळवाटा शोधण्याचे वर्तन होताना दिसत आहे. घटनेत काय लिहिलं या पेक्षा घटनेचा आत्मा काय आहे याकडे आपण लक्ष द्यायला हवे, असंही बापट नमूद करतात.सुरुवातीला आपण जी नावे घेतली ते विरोधी पक्ष नेते काँग्रेसच्या काळात झाले होते. पहिल्या विधानसभा निवडणुकीला म्हणजेच १९६२ मध्ये निवडणूक आयोगाच्या आकडेवारीनुसार एकूण २६४ जागांपैकी २१५ जागांवर काँग्रेस निवडून आली होती. दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष होता शेतकरी कामगार पक्ष. या पक्षाचे १५ आमदार निवडून गेले होते. कृष्णराव धुळप हे शेकापचेच नेते होते.

नंतर १९६७ ला झालेल्या निवडणुकांमध्ये पुन्हा काँग्रेसचे बहुमत आले. यावेळी एकूण जागांची संख्या ही २७० होती आणि शेकापच्या आमदारांची संख्या १९ वर गेली. तेव्हा देखील कृष्णराव धुळप हे पुन्हा विरोधी पक्ष नेते बनले.१९७२ च्या निवडणुकीत काँग्रेसचे २२२ आमदार निवडून आले. यावेळी देखील शेकापचा नेता विधानसभेतील विरोधी पक्षाचा नेता बनला. त्यावेळी शेकापचे केवळ ७ आमदार निवडून आले होते आणि दिनकरराव पाटील हे विरोधी पक्षाचे नेते बनले.याच काळात उत्तमराव पाटील आणि गणपतराव देशमुख हे नेते कमी संख्याबळ असूनही विरोधी पक्षाचे नेते राहिले. काही वर्षांच्या काळानंतर बबनराव ढाकणे, मृणाल गोरे आणि निहाल अहमद हे नेते देखील विरोधी पक्ष नेते झाले होते. त्यांच्या पक्षाची सदस्यसंख्या देखील तेव्हा एकूण सदस्यांच्या संख्येच्या १० टक्के नव्हती.दोन्ही सभागृहात विरोधी पक्ष नेता नाही. असं या ३० वर्षांत तरी प्रथमच होताना दिसत आहे. याआधी ते झालं असेल की नाही याची कल्पना नाही, असं ज्येष्ठ पत्रकार अभय देशपांडे यांनी बीबीसी मराठीला सांगितलं.देशपांडे पुढे सांगतात की, अनेक कमिट्यांवर विरोधी पक्ष नेता असतो तेव्हा हे पद रिक्त असणे फारसे संयुक्तिक नाही. विधान परिषदेत विरोधी पक्ष नेत्याची नियुक्ती होऊ शकते.

देशपांडे सांगतात, विधानसभेबद्दल जर सांगायचं झालं, तर कायद्यात जरी तरतूद नसली, तरी प्रथा आणि परंपरेप्रमाणे हे पद द्यावे की नाही याचा निर्णय अध्यक्ष करतात. लोकसभेमध्ये मावळणकर अध्यक्ष असताना किमान गणपूर्ती पुरते सदस्य ज्यांच्या पक्षात आहेत अशा नेत्याला विरोधी पक्ष नेते पद देण्यात यावे याचे निर्देश त्यावेळी देण्यात आले होते.परंतु, विरोधी पक्ष नेत्याला वैधानिक दर्जा नव्हता. जेव्हा १९७८ साली विरोधी पक्ष नेता वेतन आणि भत्ता हे विधेयक आलं. त्यानंतर या पदाला मंत्र्याचा दर्जा मिळाला आणि त्यावर एखादी व्यक्ती नेमावी असा आग्रह असतो. काँग्रेसच्या काळात जनता दलाचे निहाल अहमद, मृणाल गोरे, दत्ता पाटील यांच्या पक्षाची सदस्य संख्या ही १० टक्क्यांपेक्षा कमी होती तरी देखील ते विरोधी पक्ष नेते बनले.अर्थात त्या काळातील राजकारण वेगळे होते. आताचे देखील वेगळे आहे. केंद्रात १० वर्षांसाठी विरोधी पक्ष नेता नव्हता. तेव्हा आता भाजपच्या नेतृत्वातील महायुती सरकार हे पद देईलच की नाही हे सांगता येणार नाही.

विरोधी पक्ष नेता पद मिळेल की नाही या गोष्टीत विरोधी पक्ष देखील अडकला आहे. ते वैधानिक पद आहे, त्याला एक दर्जा आहे, विशेषाधिकार आहेत हे जितकं खरंय, तितकंच हे देखील खरंय आहे की सभागृहातील साध्या सदस्यालाही आपल्या कुठल्याही अन्य बाकड्यावर बसून महत्त्वाचे विषय तेवढ्याच तीव्रतेने मांडता येऊ शकतात. हे देखील त्यांनी लक्षात ठेवले पाहिजे, असं मत अभय देशपांडे यांनी व्यक्त केलं.

सत्ताधारी पक्षाची काय भूमिका आहे?

विरोधी पक्षाच्या निवडीबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विचारले असता त्यांनी माध्यमांना सांगितले की हा विषय माननीय विधानसभा अध्यक्ष आणि विधान परिषदेचे सभापती यांच्या अखत्यारीतील आहे. त्यामुळे तो जो काही निर्णय घेतील तो आम्हाला मान्य असेल.उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की विरोधी पक्षाने आत्मचिंतन करायला हवे. त्यांना जनतेना का नाकारले याचा त्यांनी विचार करावा. जनतेचे प्रश्न मांडायचे सोडून कोणते पद मिळेल याचीच विरोधकांना चिंता आहे. गेल्या वेळी लोकसभेत हे विरोधी पक्ष नेते पद नव्हते. पण यावेळी पुरेशी संख्या झाली तेव्हा मात्र ते मिळाले. तेव्हा विरोधकांना आता पुढच्या वेळेसाठी प्रयत्न करावेत.

विरोधी पक्ष नेते पद नसणे हे घटनाबाह्य आहे अशी टीका विरोधक करत आहेत, यावर भाजपची प्रतिक्रिया काय आहे असं विचारले असता भाजप नेते अतुल भातखळकर यांनी बीबीसी मराठीला सांगितले की जर नियमातच अशी तरतूद नसेल तर अशी टीका करण्यात काय अर्थ आहे? जर हे नियमात बसणारे आहे असे वाटत असेल तर विरोधकांनी सुप्रीम कोर्टात जावे.माझा विरोधकांना असा सल्ला आहे की तुम्ही जनतेचे प्रश्न मांडावेत. केवळ पदाचीच चर्चा करू नये. १९७८ साली आलेल्या बिलानुसार विरोधी पक्ष नेत्याला कॅबिनेट मंत्र्याचा दर्जा असतो. पण त्यासाठी दहा टक्के सदस्य संख्या असावी असा नियम आहे, असे भातखळकर यांनी सांगितले.भाजपचे प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी बीबीसी मराठीला सांगितले की विरोधी पक्ष नेतेपदाची निवड करणे हा सर्वस्वी विधानसभा अध्यक्ष आणि सभापतींचा अधिकार आहे. सरकार किंवा पक्ष त्यामध्ये हस्तक्षेप करत नाही. विधानसभा अध्यक्ष योग्य तो निर्णय घेतील.

## मस्केंना लागला

प्लॉटची गुंठेवारीची प्रत खरी आहे की खोटी, हे पालिका अभिलेखे विभागाने ठरवून देणे आवश्यक होते. यासाठी तक्रारदारांनी रितसर शुल्क पालिकेत भरले होते. परंतु, अभिलेखे विभागात कार्यरत असलेल्या आशिष मस्के या सफाई कामगाराने हे काम करून देण्यासाठी तक्रारदाराकडे एक हजार रुपयांची लाच मागितली. एवढेच नव्हे तर, त्याने तक्रारदारांशी उद्धट वर्तनही केले होते. या त्रासाला कंटाळून तक्रारदारांनी बीडच्या एसीबीकडे तक्रार नोंदवली. एसीबीच्या पथकाने मंगळवारी दुपारी बीड पालिकेच्या आवारातच सापळा लावला. आशिष मस्के याने पैसे स्वीकारताच एसीबीच्या पथकाने त्याला तातडीने ताब्यात घेतले. एका कर्मचाऱ्याच्या आत्महत्येमुळे पालिका आधीच चौकशीच्या फेऱ्यात असताना, लगेच दुसऱ्या महिन्यात लाचखोरीचे प्रकरण उघडकीस आल्याने पालिका प्रशासनाच्या कामकाजावर गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. एसीबीची ही कारवाई पोलिस उपअधीक्षक सोपान चिट्टमपल्ले यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने केली.

## काँग्रेसच्या नेत्याला

अध्यक्ष हे विरोधीपक्ष नेतेपदाची नियुक्ती करत असतात मात्र यामध्ये सत्ताधारी पक्षाचा मोठा वाटा असल्याचे दिसून येते. विरोधकांकडून पुरेसे संख्याबळ नसताना विरोधीपक्ष नेतेपद द्यायचे की नाही हे विधानसभा अध्यक्ष यांच्या मर्जीवर असते. मात्र, संख्याबळावर विरोधी पक्षनेतेपद नसते, असा दावा भास्कर जाधव यांनी केला आहे. यासाठी त्यांनी मृणाल गोरे, दि.बा. पाटील यांची उदाहरणे देत विरोधकांकडे पुरेसे संख्याबळ नसताना देखील विरोधी पक्षनेतेपद दिले होते, असे म्हटले होते.

काँग्रेस, ठाकरेंची शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात फूट पाडण्यासाठी भाजपकडून विजय वडेट्टीवार आणि अनिल परब यांची नावे सुचवण्यात आली आहेत. मात्र, काँग्रेस आणि ठाकरेंच्या शिवसेना ही भास्कर जाधव आणि सतेज पाटील यांच्या नावावर ठाम आहेत. विरोधकांमध्ये या मुद्यावर कुठल्याही प्रकारची फूट पडणार नाही. सर्व विरोधक एकत्र राहतील, असे मविआमधील नेते सांगत आहे.

## आमदाराकडून

काँग्रेसनं अंतर राखलंआहे. पक्षानं त्यांना निलंबित केलं आहे. यानंतर कबीर यांनी आपण असदुद्दीन ओवेसी यांच्या मजलिस ए इत्तेहादुल मुस्लिमीन पक्षाशी युती करण्यास तयार असल्याची घोषणा केली. आपण ओवेसी यांच्या खासगी सचिवांच्या संपर्कात असल्याचंही त्यांनी सांगितलं. कबीर यांनी एमआयएममध्ये यावं असा ओवेसी यांचा प्रयत्न आहे. पण कबीर युती करण्यास उत्सुक आहेत.बाबरी मशीद उभारण्याची घोषणा केल्यावर कबीर यांनी आगामी विधानसभा निवडणुकीसाठी व्यूहनीती आखण्यास सुरुवात केली आहे. २२ डिसेंबरला आपल्या नव्या राजकीय पक्षाची घोषणा करणार असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. १७ डिसेंबरला आमदारकीचा राजीनामा देणार, असं ते आधी म्हणाले होते. पण आता त्यांनी राजीनाम्याचा विचार रद्द केला आहे.हुमायू कबीर यांचा राजकीय प्रवास अनेक चढउतारांचा राहिला आहे. त्यांनी १९९० च्या दशकात युथ काँग्रेसमधून राजकीय कारकिर्दीचा सोडून दिले. २०११ मध्ये ते काँग्रेसच्या तिकिटावर रेजीनगरमधून आमदार झाले. वर्षभरानंतर ते तृणमूल काँग्रेसमध्ये गेले, मंत्री झाले. तीन वर्षांनंतर तृणमूलनं पक्षविरोधी कारवायांसाठी त्यांना निलंबित केलं. २०१६ मध्ये ते अपक्ष लढले आणि पराभूत झाले. २०१८ मध्ये कबीर भाजप मध्ये गेले. त्यांनी मुर्शिदाबाद लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवली आणि पराभूत झाले. तृणमूलनं त्यांना ६ वर्षांसाठी निलंबित केलं होतं. हा कालावधी संपताच २०२१ मध्ये निवडणुकीच्या तोंडावर ते तृणमूलमध्ये परतले. भरतपूरमधून निवडणूक लढवत ते विजयी झाले. आता तृणमूलनं कबीर यांच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित केले आहेत. '२०१९ मध्ये भाजपकडून लोकसभा लढवली. मोदींच्या फोटोसह प्रचार केला. भाजप नेत्यांची गळाभेट घेतली. मग आता कबीर स्वत:ला बाबरी मशिदीचे चॅम्पियन कसे म्हणवून घेतात,' असा सवाल तृणमूलकडून विचारला जात आहे.

## छेड काढणाऱ्या शिपायाला

बसवायचा आहे तेथील फोटो काढायचा असे म्हणून शेतात गेलेल्या महिलेचा हात धरून छेडछाड केली. त्यानंतर तो ग्रामपंचायत शिपाई शनिवार रोजी सकाळी १० वाजता गावात आल्यानंतर घरासमोरून जात असताना तेथे जमलेल्या महिलांनी त्याला चांगला चोप देत मारहाण केली. त्याला महिलांनी टेम्पोत टाकून तलवाडा पोलिस ठाण्यात नेऊन त्याच्याविरुद्ध महिलेच्या फिर्यादीवरून विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास तलवाडा पोलिस करत आहेत.